## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

### माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रारीची तपासणी सूची

**क्र. रामाआ/तक्रार/४४७/२०२१/अहमदनगर**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. नौशाद इलियाज खान<br>रा. प्लॉट नं. २५, मन्नत, श्रीकृष्ण नगर, हॉटेल सागर समोर, पाईपलाईन रोड, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर. | तलाठी,<br>तलाठी कार्यालय, जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर. |

**सुनावणी दिनांक – ३०/०६/२०२३**

| तक्रार अर्जाचा दिनांक | द्वितीय अपील क्रमांक | आयोगाने दिलेल्या निर्णयचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या अहवालाचा दिनाक |
|---|---|---|---|
| २८/०७/२०२१ | १८०७/२०१८/अहमदनगर | १८/०५/२०२१ | ---- |

तक्रारदार यांनी दि. २८/०७/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "सदर जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती दिलेली नाही. " असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

- जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार दि. २८/०७/२०२१ पर्यंत अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. आयोगाच्या आदेशाचा जाणीवपुर्वक टाळल्या/ दुर्लक्षित केल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा तलाठी, जामखेड, यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी.

२. सदर तक्रारीच्या सुनावणीस सर्व पक्षकार अनुपस्थित होते.

३. द्वितीय अपिल आदेश-

द्वितीय अपील क्रमांक १८०७/२०१८/अहमदनगर वरील निर्णय दिनांक १८/०५/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, जामखेड यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३/०८/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी."

४. तक्रारदार यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

दिनांक २३/०८/२०१७ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक १३/०७/२०१७ रोजीचा अर्ज घर जागा मिळकत नं. ६३/५७, ६१/५५, ६४/५८ व ६०/५४ ला वारसाची नोंद लावण्याबाबत सविस्तर माहिती मागितली होती.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुराव्या वरुन असे दिसून येते की,

१. या प्रकरणी तक्रारदारास आयोगाचा आदेश टपालाने दिनांक १६/०७/२०२१ रोजी प्राप्त झाला असुन तक्रारदाराने आयोगास तक्रार दाखल करतांना सदर आदेशाची प्रत जोडली असुन त्यावर टपाल शाखेचा शिक्का असुन आयोगाचा आदेश दिनांक १६/०७/२०२१ रोजी प्राप्त झाल्याचे स्पष्ट होते. तसेच आयोगाने निर्णय मिळाल्यापासुन १५ दिवसाच्या आत माहिती पुरवावी असे नमुद केले आहे. तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांना निर्णय मिळाला किंवा नाही याबाबत कोणतीही शहानिशा न करता तक्रार अर्ज केल्याचे दिसुन येते. तक्रारदारास निर्णय प्राप्त झाल्यानंतर १२ दिवसात म्हणजे दिनांक २८/०७/२०२१ रोजी तक्रार अर्ज केल्याचे दिसुन येते. म्हणुन सदर तक्रार चौकशी योग्य नाही, ही बाब विचारात घेता तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. प्रस्तुत तक्रारीत काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** अपी-२९८२ 01 DEC 2023